# जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय सेतु समिती बुलडाणा

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र तथा ई.ग्रंथालय,जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा

जिल्हास्तरीय सेतु समिती बुलडाणा अंतर्गत महाराष्ट लोकसेवा आयोग व केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांना बसणा-या उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षण मार्गदर्शन केंद्र ई-ग्रंथालय सेवा व सुविधा जिल्हाधिकारी कार्यालय (नियोजन भवन) बुलडाणा येथे सुरु करण्यात आलेले आहे.यापुर्वि प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांची मुदत नोव्हेंबर २०१६ ला संपत असल्यामुळे नविन उमेदवारांची निवड करण्यात येत आहे.

या ग्रंथालयामध्ये ५० विदयार्थ्यांना निशुल्क प्रवेश उपलब्ध करुन दयावयाच्या आहेत . ग्रंथालयात प्रवेश घेण्यासाठी पात्र उमेदवारांचे Offline अर्ज मागविण्यात येत आहेत. .अर्जाचा नमुना www.buldhana.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.सदर नमूना डाउनलोड करुन सदर अर्जासोबत पदविचे प्रमाणपत्र जोडुन अर्ज दि.१०/१०/२०१६ ते दि.२१/१०/२०१६ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत ( शासकीय सुटी वगळुन ) **ई.ग्रंथालय ,नियोजन भवन ,जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा** येथे जमा करण्यात यावेत. किंवा सदर अर्ज व पदवीचे प्रमाणपत्र स्कॅन करुन elibdisbul@gmail.com या ई-मेल आयडी वर दि.१०/१०/२०१६ रोजी सकाळी १०.०० पासुन ते दि.२१/१०/२०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत पाठवावेत. निर्धारीत दिनांकानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

## प्रवेशाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१.उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा .

२.उमेदवाराची निवड ही एक वर्षाच्या कालावधीकरीता राहील.

३. उमेदववराची निवड करतांना बुलडाणा जिल्हयातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४. निवड झालेल्या उमेदवारांना कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.त्यांना फक्त ग्रंथालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

५.लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व परीक्षा क्रमांक हे दि. ५ नोव्हेंबर २०१६ रोजी www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६.आवश्यकता असल्यास परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दि.१३ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ११.३० या कालावधीत एका सत्रामध्ये घेण्यात येईल.सदर यादी व प्रवेशपत्र www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर दि. ५ नोव्हेंबर २०१६ रोजी टाकण्यात येईल सदर प्रवेशपत्र पात्र उमेदवारांनी डाउनलोड करुन सदर प्रवेशपत्र भरुन त्यासोबत उमेदवारांनी परीक्षेला येतांना छायांकीत ओळखपत्र उदा.आधार कार्ड,मतदान कार्ड,डायव्हिंग लायसन,पॅनकार्ड ई.पैकी एक पुरावा सोबत आणावा .

७.वेळोवेळी दयावयाच्या सुचना किंवा बदल www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८.पात्र उमेदवारांची निवड करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय सेतु समिती बुलडाणा यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हास्तरीय सेतु समिती बुलडाणा

# अर्जाचा नमुना

## जिल्हास्तरीय सेतु समिती अंतर्गत स्पर्धापरीक्षा निवडीकरीता अर्जाचा नमुना

| अ.क्र. | तपशिल | उमेदवाराने भरावयाची माहीती |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपुर्ण नाव | |
| २. | अर्जदाराचा मुळ पत्ता | |
| ३. | अर्जदाराचा सध्याचा पत्ता | |
| ४. | शैक्षणीक अर्हता | |
| ५. | जन्म तारीख | |
| ६. | यापुर्वी एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. च्या दिलेल्या परीक्षांचा तपशिल | |

वरील माहीती मी स्वतः दिलेली असुन ती अचुक आहे.त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत आढळुन आल्यास त्यासाठी मी स्वतः जबाबदार राहीन.

दिनांक -

ठिकाण-

अर्जदाराचा मोबाईल क्र----------------------

अर्जदाराची स्वाक्षरी